महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website: https://msbsvet.edu.in Email: msbve.secretary@dvet.gov.in दुरध्वनी क्र.: ०८६५५९४४८५१/५२/५३

पत्र क्र. का.क्र.०४/ जुन परीक्षा /२०२६/११८७ दिनांक : ०५/०६/२०२६

## परिपत्रक

विषय: जून -२०२६ एक वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन अँड्रॉइड मोबाईल ॲप्लिकेशन व Web Based पध्दतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे अभ्यासक्रम व विषयनिहाय वेळापत्रक व कार्यपध्दती जाहीर करण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. मंडळाचे पत्र क्र. पत्र क्र. का.क्र. ४/परीक्षा/२०२६/९७५, दि ०६.०५.२०२६

१ एक वर्ष अभ्यासक्रमाची परीक्षा दि. २३/०६/२०२६ पासून आयोजीत करण्यात आलेल्या आहेत, सदर परीक्षेचे संक्षिप्त वेळापत्रक संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२ या परिपत्रका सोबत जून -२०२६ एक वर्ष कालावधीच्या या पूर्वीच्याच पध्दतीने प्रात्यक्षिक व थेअरी विषयाच्या ऑनलाईन अँड्रॉइड मोबाईल ॲप्लिकेशन व Web Based पध्दतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे अभ्यासक्रमनिहाय, विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक जोडण्यात येत आहे.

३ तसेच सदर परीक्षेच्या कार्यपध्दती ( SOP ) सोबत सोडण्यात येत आहे.

४ तसेच सदर वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर (www.msbsvet.edu.in) सुध्दा प्रसिध्द करण्यात येत आहे. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्या स्तरावरुन त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांना सदर वेळापत्रकाबाबत अवगत करावे. विद्यार्थ्यांना संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून वेळापत्रकाप्रमाणेच परीक्षा देण्याबाबत सुचना दयाव्यात.

५ सदर परीक्षेकरीता परीक्षा शुल्क दि. ०८/०६/२०२६ पासुन दि. २१/०६/२०२६ पर्यंत या मुदतीत आकारण्यात येईल.

६ अंतिम मुदतीनतंर कुठल्याही परिस्थितीत परीक्षा फी स्विकारली जाणार नाही यांची नोंद घ्यावी व दिलेल्या मुदतीपूर्वीच नियमित व माजी विदयार्थ्यांची परीक्षा फी भरावी. या बाबत सर्व संस्थांनी विदयार्थांना आवश्यक त्या सुचना दयाव्यात.

सोबत: १) सविस्तर वेळापत्रक

२) परीक्षेची कार्यपध्दती ( SOP )

(ज्योती लोहार)

सचिव तथा परीक्षा नियंत्रक

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)

२. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या परीक्षा संबंधित संस्था

३. संगणक विभाग व परीक्षा विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)

४. निवडनस्ती

# जून -२०२६ एक वर्ष **अभ्यासक्रम ऑनलाईन अँड्रॉइड मोबाईल ॲप्लिकेशन व Web Based MCQ परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा बाबतच्या कार्यपध्दती (SOP)**

## १ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाची जबाबदारी/कर्तव्ये

- MCQ थिअरी ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाची नेमणूक करणे.
- परीक्षा केंद्रावर लाईट व इंटरनेट सेवा इ. आवश्यक बाबी बाबत खात्री करणे.
- परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीतपणे सुरु असल्याबाबत खात्री करणे.
- परीक्षा काळात कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झाल्यास त्वरीत उपाययोजना करणे.
- परीक्षार्थ्यांची उपस्थिती अहवाल परीक्षा केंद्रांना पोर्टलवर अपलोड करणेबाबत सूचना देणे.
- आपल्या जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्थाना परीक्षेच्या, मंडळाकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्याचे Loging ID व पासवर्ड विहीत मुदतीत निर्गमित करणे.
- जिल्ह्यातील परीक्षा केंद्रातील उपस्थिती/अनुपस्थिती अहवाल तयार करून मंडळ कार्यालयास सादर करणे.
- प्रात्यक्षिक परीक्षेकरीता बाहय परीक्षकांची नेमणूक करुन प्रात्यक्षिक परीक्षा पार पडल्यावर विद्यार्थ्याची उपस्थिती व गुण पोर्टलवर सबमिट करणेबाबत संस्थांना सूचना देऊन त्यांनी सबमिट केल्याबाबत खात्री करणे.

- ऑनलाईन परीक्षा संबंधित सर्व संस्थांमध्ये CCTV कॅमेरा असणे अनिवार्य आहे. परीक्षा देणा-या सर्व विदयार्थांचे चित्रीकरण परीक्षेच्या कालावधीत संपूर्ण वेळ CCTV कॅमेरामध्ये होणे आवश्यक आहे.  परीक्षेच्या दरम्यान सीसीटीव्ही चित्रीकरणात परीक्षेस उपस्थित सर्व विद्यार्थी सीसीटीव्हीच्या कक्षेत येणे आवश्यक आहे. सदर चित्रीकरण परीक्षेचा निकाल लागेपर्यंत जतन करणे आवश्यक आहे. परीक्षेत काही गैरप्रकार आढळल्यास संस्थेकडून सदर सीसीटीव्ही चित्रीकरण मागवण्याचे मंडळास पूर्ण अधिकार असतील याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.याबाबत सर्व संस्थांना आपल्यास्तरावरुन सूचना निर्गमित करुन CCTV कॅमेरा सुस्थितीत असल्याबाबत तपासून खात्री करावी.

## २ पर्यवेक्षकांची जबाबदारी/कर्तव्ये

- परीक्षा संबंधी सुचनांचे पालन करणे.

- ऑनलाईन परीक्षा संबंधित सर्व संस्थांमध्ये CCTV कॅमेरा असणे अनिवार्य आहे. परीक्षा देणा-या सर्व विदयार्थांचे चित्रीकरण परीक्षेच्या कालावधीत संपूर्ण वेळ CCTV कॅमेरामध्ये होणे आवश्यक आहे. परीक्षेच्या दरम्यान सीसीटीव्ही चित्रीकरणात परीक्षेस उपस्थित सर्व विद्यार्थी सीसीटीव्हीच्या कक्षेत येणे आवश्यक आहे. सदर चित्रीकरण परीक्षेचा निकाल लागेपर्यंत जतन करणे आवश्यक आहे. परीक्षेत काही गैरप्रकार आढळल्यास संस्थेकडून सदर सीसीटीव्ही चित्रीकरण मागवण्याचे मंडळास पूर्ण अधिकार असतील याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी. याबाबत संबंधित पर्यवेक्षकांनी खात्री करावी व CCTV कॅमेरा नसल्यास त्याबाबत संबंधित जिल्हा कार्यालयास त्वरीत कळवावे.

- ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर लाईट व इंटरनेट सेवा असल्याचे खात्री करणे.
- परीक्षार्थ्यांसाठी परीक्षा कालावधीत अडचण येणार नाही याची खबरदारी घेणे व परीक्षा सुरळीत होण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे.
- परीक्षार्थ्यांचे हॉलतिकीट तपासून खातरजमा करणे.
- परीक्षार्थ्यांची उपस्थिती घेणे व जिल्हा कार्यालयास कळविणे.
- पर्यवेक्षकाने परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर परीक्षा केद्रावर उपस्थित रहाणे.
- परीक्षेशी संबंधित नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तिस परीक्षा केंद्राच्या आवारात अथवा परीक्षा दालनात प्रवेश देण्यात येवू नये.
- पर्यवेक्षकांनी परीक्षा काळात खालील प्रकारचा गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

  उदा. १.परीक्षार्थी एकत्र बसुन परीक्षा देणे.

  २. पुस्तके, इतर भ्रमणध्वनी संगणकव्दारे उत्तरे शोधणे.

  ३.एकमेकांना उत्तरे विचारणे

  ४.प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांव्दारे परीक्षार्थ्यांना उत्तरे सांगणे

  ५. इतर परीक्षार्थ्यांना उत्तरे विचारणे, इत्यादी

- परीक्षा केंद्रावर गैरव्यवहार आढळल्यास तात्काळ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयास कळविणे.

३. <u>MCQ ऑनलाईन थिअरी परीक्षेसाठी परीक्षा केंद्र असणाऱ्या संस्थांची जबाबदारी व कर्तव्ये.</u>

- ऑनलाईन परीक्षा संबंधित सर्व संस्थांमध्ये CCTV कॅमेरा असणे अनिवार्य आहे. परीक्षा देणा-या सर्व विदयार्थांचे चित्रीकरण परीक्षेच्या कालावधीत संपूर्ण वेळ CCTV कॅमेरामध्ये होणे आवश्यक आहे. परीक्षेच्या दरम्यान सीसीटीव्ही चित्रीकरणात परीक्षेस उपस्थित सर्व विद्यार्थी सीसीटीव्हीच्या कक्षेत येणे आवश्यक आहे. सदर चित्रीकरण परीक्षेचा निकाल लागेपर्यंत जतन करणे आवश्यक आहे. परीक्षेत काही गैरप्रकार आढळल्यास संस्थेकडून सदर सीसीटीव्ही चित्रीकरण मागवण्याचे मंडळास पूर्ण अधिकार असतील याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

- परीक्षा संबंधी सुचनांचे पालन करणे.
- MCQ थिअरी ऑनलाईन परीक्षा परीक्षार्थ्यांस, त्याने/ तिने प्रवेश घेतलेल्या संस्थेमध्येच देणे आवश्यक आहे.
- दिलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षार्थ्यांने परीक्षा देणे आवश्यक आहे.
- परीक्षा केंद्रावर परीक्षार्थ्यांस Android Mobile अथवा कॉम्प्युटर उपलब्ध करुन देणे
- मंडळाने निर्गमित केलेल्या User ID व पासवर्डचा वापर करुनच परीक्षा देणे आवश्यक आहे. दुसऱ्या संस्थेचा अथवा इतर परीक्षार्थ्यांचा User ID व पासवर्ड वापरुन परीक्षा देऊ नये.
- परीक्षार्थ्यांची आसनव्यवस्था तसेच परीक्षे संबंधीत साहीत्याची व्यवस्था संस्थेने करणे.
- परीक्षार्थ्यांस ऑनलाईन परीक्षे संबधी सुचना देणे.
- परीक्षा केंद्रावर कॉपी व गैरव्यवहार होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेणे व काही गैरप्रकार घडल्यास तात्काळ जिल्हा कार्यालयांस कळविणे.
- संस्थानी परीक्षा काळात खालील प्रकारचा गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

  उदा. १.परीक्षार्थी एकत्र बसुन परीक्षा देणे.

  २. पुस्तके, इतर भ्रमणध्वनी संगणकव्दारे उत्तरे शोधणे.

  ३.एकमेकांना उत्तरे विचारणे

  ४.प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांव्दारे परीक्षार्थ्यांना उत्तरे सांगणे

  ५. इतर परीक्षार्थ्यांना उत्तरे विचारणे, इत्यादी

- ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर /संस्थेमध्ये लाईट व इंटरनेट सेवा इ. आवश्यक बाबी विद्यार्थ्याना उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे.
- परीक्षार्थ्यांचे, पर्यवेक्षकांची स्वाक्षरी असणारे हजेरी अहवाल, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयास कळविणे. प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण व हजेरी अहवाल अठ्ठेचाळीस तासाच्या आत पोर्टलवर सबमिट करणे आवश्यक आहे.
- परीक्षा कालावधीत पर्यवेक्षक व इतर कर्मचाऱ्यास आवश्यक सहकार्य करणे.
- परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेस दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे उपस्थित राहणेबाबत सूचना देणे.
- परीक्षा केंद्रावरती परीक्षार्थ्यांना हॉलतिकीट शिवाय प्रवेश देऊ नये व परीक्षा देण्यास अनुमती देऊ नये , असे आढळल्यास सदर परीक्षार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.



(ज्योती लोहार)

सचिव तथा परीक्षा नियंत्रक